श्री.तुळजाभवानी मंदिर, तुळजापूर येथील देवस्थान इनाम जमीन गैरव्यवहार चौकशी करण्याकरिता समिती गठित करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र R&FD-२८०६०(६०)/२/२०२६-J७अ (ई-१७५२९१६)
पहिला मजला, मंत्रालय मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक- २०.०७.२०२६.

प्रस्तावाना -

विधानसभा नियम- २९३ अन्वये सभागृहातील चर्चेवेळी मा.विधानसभा सदस्य यांनी "तुळजाभवानी जमीन घोटाळ्याबाबत" मुद्दा उपस्थित केला होता. सदर मुद्याच्या अनुषंगाने या चर्चेस उत्तर देताना मा. मंत्री महसूल यांनी "या प्रकरणी विभागीय आयुक्त, पुणे यांच्यामार्फत चौकशी करण्यात येईल," असे आश्वासन दिले. सदर आश्वासनाच्या पूर्ततेसाठी श्री.तुळजाभवानी मंदिर, तुळजापूर येथील देवस्थान इनाम जमीन गैरव्यवहार चौकशी करण्याकरिता विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय-

विधानसभा नियम- २९३ अन्वये सभागृहातील चर्चेवेळी मा.विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेले मुद्दे, आक्षेप, महसूल अभिलेख व कायदेशीर बाबींची तपासणी करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

१	विभागीय आयुक्त, पुणे	अध्यक्ष
२	जिल्हाधिकारी, अहिल्यानगर	सदस्य
३	जिल्हाधिकारी, सोलापूर	सदस्य
४	सह आयुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे	सदस्य सचिव

२. उक्त समितीने विधानसभा नियम- २९३ अन्वये सभागृहातील चर्चेवेळी उपस्थित केलेल्या खालील मुद्यांच्या अनुषंगाने सर्व अभिलेख्यांची तपासणी करुन, मुद्देनिहाय चौकशी अहवाल १ महिन्यात शासनास सादर करावा :-

१. हिंदु देवस्थान जमीन घोटाळा तुळजाभवानी मंदिरात ४१२० एकर जमीनीची निजामाकडून देण्यात आली.

२. सदर जमिनीची खरेदी- विक्री होऊ शकत नाही असे असतानासुध्दा महसूल अधिका-यांच्या संगनमताने खाजगी व्यक्तींना वाटप करण्यात आली.

३. देवस्थानच्या नावे ३३९७ एकर जमीन असताना प्रत्यक्ष जमिनीचा ताबा मात्र काही खाजगी व्यक्तींच्या नावे वाटप करण्यात आली आहे.

४. जगदंबा न्यासाच्या नावे असलेली ४०३ एकर जमीन मुख्य न्यासाला अंधारात ठेवून थेट सदर जमीन खाजगी व्यक्तीच्या नावे करण्यात आली.

५. अव्वल कारकून यांनी अधिकाराचा गैरवापर करुन २६१ एकर जमीन खाजगी व्यक्तींच्या नावे केली.

६. अपसिंगा व उपळा येथील १५८ एकर जमीन अनधिकृतपणे फेरफार नोंदी करण्यात आल्या.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला असून त्याचा संकेतांक २०२६०७२०१७४०१३९२४८ असा आहे. हा आदेश निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KAILAS ARJUN GAIKWAD

Digitally signed by KAILAS ARJUN GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=47D160717AE29C2D2661B5275D8B9B4CFAE93893BE65A27853145A4C04D865CD, cn=KAILAS ARJUN GAIKWAD
Date: 2026.07.20 17:41:01 +05'30'

(कैलास गायकवाड)
शासनाचे सहसचिव

प्रत-

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय मुंबई
२. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई
४. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
५. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
६. अपर मुख्य सचिव, महसूल यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई
७. विभागीय आयुक्त, पुणे
८. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर
९. जिल्हाधिकारी, सोलापूर
१०. जिल्हाधिकारी, धाराशिव यांना माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित
११. सह आयुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे
१२. सह सचिव, महसूल व वन विभाग (जमीन-७अ), मंत्रालय मुंबई